# राजर्षी शाहू महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर

प्रा. विनोद सहदेव वानखडे डॉ.पतंगराव कदम महाविद्यालय रामानंदनगर (बुर्ली)

email – vinodwankhadepmpl358@gmail.com Mob No - 9834927291

---

भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आणि राजर्षी शाहू महाराजांच्या स्मृती शताब्दी साजरी करतांना राजर्षी शाहू महाराज **व** डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेले कार्य त्यांच्यामध्ये झालेला पत्रव्यवहारत्यांचे विचारआजही प्रेरणादायीआहेत.

महात्मा फुले यांच्या पासून सुरु झालेली सामाजिक लोकशाहीची चळवळ राजर्षी शाहू महाराज हे या चळवळीचे आधारस्तंभ होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी ही चळवळ समर्थपणे पुढे चालविली. छत्रपतीं शाहू महाराज मूलगामी क्रांतीचे नेते होते एवढेच काय तर त्यांनी समजाच्या सर्वागीण विकासासाठी विचार केला फुले शाहू आंबेडकर ही विचारसरणी मुळात समाजोद्धारासाठी प्रेरणादायी आहे.यांचा विचार म्हणजे पुरोगामी विचार आहे प्रस्थापिताना हा विचार परवडण्यासारखा नव्हता म्हणून तर यांच्या विचाराला विरोध झाला महात्मा फुलेना तर साहित्यिक मानायला तयार नव्हते. पहिल्याअखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात न्यायमुर्ती महादेव गोविंद रानडे यांनी निमंत्रण दिले नव्हते. राजर्षी शाहूमहाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी महात्मा फुलेना आदर्श मानून आपल्या कार्याची धुरा पुढे चालू ठेवली.

भारतीय समाज हा विषमतेने बरबटलेला होता अस्पृशता हा या भारतीय समाजावर लागलेला कलंक होता. समताधीष्टीत समाज निर्माण करण्यासाठी, विषमता नष्ट करण्यासाठी,अस्पृश्य हेसुद्धा मानवच आहेत त्यांना माणूस म्हणून जगणे प्राप्त करून देण्यासाठी त्यांची गुलामगिरी नष्ट करण्यासाठी, महारवतने खालसा करण्यासाठी अस्पृश्यासाठी शिक्षणाच्या सवलती, सुविधा,रोजगाराचे साधन, रोजगार, सरकारी नोकऱ्या मध्ये आरक्षण प्राप्त करून देण्यासाठी तसेच त्यांच्यामध्ये आत्मविश्वास,स्वाभिमान,निर्माण करण्याचेव आंतरजातीय विवाहाला प्रोत्साहन देण्याचे काम राजर्षी शाहूमहाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी केले.

राजर्षी शाहूमहाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची पहिली भेट १९१९मध्ये मुंबई येथेपरळ चाळीत झाली. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या कोल्हापूर भेटीवेळी कोल्हापूर शहरातून मिरवणुक काढण्यात आली. राजेशाही थाटात त्यांचे स्वागत व पाहूणचार केला आणि सोनतळी कॉम्प वर सहभोजन केले.बाबासाहेबांना जरीपटक्याचा आहेर करून जाहीर सत्कार केला. यावेळी बाबासाहेब म्हणतात “छत्रपतींनी दिलेला मनाचा जरिपटका माझ्या मस्तकी चढविला आहे, त्याचा मी सदैव मान राखीन .”

भारतातील जातीयता नष्ट करण्यासाठी सामाजिक लोकशाही निर्माण कण्यासाठी, अस्पृश्यांचे प्रश्न जनतेसमोर व इंग्रज सरकार समोर मांडण्यासाठी बाबासाहेबांनी वृतपत्र काढण्याचे ठरविले यास राजर्षी शाहूमहाराजांची साथ मिळाली.महाराजांनी दिलेल्या अर्थसाहायातून’मूकनायक’या पाक्षिकाचा पहिला अंक ३१ जानेवारी १९२० रोजी प्रसिद्ध झाला.अस्पृशांच्या व्यथा, वेदना मांडण्यासाठी न्याय व हक्क मिळविण्यासाठी मूकनायक या वृत्तपत्राचा खूप उपयोग झाला.

डॉ. बाबासाहेबआंबेडकर व शाहू महाराज यांचे संबंध दृढावू लागले होते सामाजिक लोकशाहीची चळवळ गतिमान करण्यासाठी कोल्हापूर संस्थानात ‘माणगाव’ मध्ये २० व २१ मार्च १९२० रोजी दक्षिण महाराष्ट्राच्या दलित परिषदेचे पहिले अधिवेशन भरविण्यात आले हे ऐतिहासिक अधिवेशन म्हणजे माणगाव परिषद होय. या सभेचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेबआंबेडकर होते.या परिषदेत शाहू महाराजांची उपस्थिती व त्यांनी केलेले भाषण तमाम अस्पृश्य बांधवांचे मनोबल उंचावणारे होते.बाबासाहेबांनी मूकनायक वृत्तपत्र काढल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करतात. महाराजांच्या संस्थानात अस्पृश्याना गावचावडीवर हजेरी दयावी लागे हजेरी प्रथा म्हणजे गुलामगिरीच,अस्पृश्यांना गैरहजेरीची भीती दाखवून तिथले अधिकारी विनामोबदला काम करवून घेत असत. हजेरी प्रथेमुळे

अस्पृश्य समाजाला जर कोणी आजारी पडले तर त्याला भेटता येत नसे.लहान मुलांच्या आई वडिलांना हजेरी देण्यासाठी जावे लागल्याने बऱ्याचदा ते मुले मृत्यू पावत असत.जातीभेद मोडून काढून अस्पृश्यांना माणूस म्हणून वागविले पाहिजे त्याच वेळी बाबसाहेबांची स्तुती करताना महाराज म्हणतात,"आज त्यांना पंडित पदवी देण्यास तरी काय हरकत आहे.विद्वनात ते एक भूषणच आहेत आर्यसमाज,बुद्धसमाज व ख्रिस्ती समाज यांनी त्यांना आनंदाने घेतले असते. परंतु ते तुमचा उद्धार करण्याकरिता तिकडे गेले नाहीत.या बद्दल तुम्ही त्यांचे आभार मानले पाहिजे व मी ही मानतो ."

" तुम्हीतुमचा पुढारी शोधून काढलात ह्या बद्दल मी तुमचे अंतःकरण पूर्वक अभिनंदन करतो.माझी खात्री आहे की,आंबेडकर तुमचा उद्धार केल्याशिवाय राहणार नाहीत. इतकेच नव्हे तर अशी एक वेळ येईल की ते सर्व हिंदुस्थानचे पुढारी होतील ...... शेवटी आंबेडकराना माझी अशी विनंती आहे की,त्यांनी जाणेचे पूर्वी रजपूतवाडीच्या कॅम्पवर माझे बरोबर भोजनाला येण्याची तसदी घ्यावी."

माणगाव परिषदेमध्ये शाहू महाराजांचा वाढदिवस हा सणाप्रमाणे साजरा करण्याचा ठराव मांडण्यात आला व तो पास करण्यात आला.अस्पृश्यांच्या राजकीय हक्कावर गदा येऊ नये म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कर्मवीर शिंदे यांनी मांडलेली कैफियत अस्पृश्यांच्या हिताला कशी बाधक आहे हे जाहीर करण्याचे ठरविले होते.अस्पृश्यांच्या राजकीय आकांक्षा काय आहेत याचा जाहीर खुलासा व्हावा म्हणून 'अखिल भारतीय बहिष्कृत समाजाची पहिली परिषद नागपूर येथे ३० व ३१ मेव १ जून रोजी शाहू महारांजाच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या भाषणात महाराज म्हणाले होते" अस्पृश्य हा शब्द कोणाही माणसाला लावणे हे फार निंद्य आहे. तुम्ही अस्पृश्य नाही तुम्हास अस्पृश्य मानणाऱ्या पुष्कळ लोकापेक्षा जास्त बुद्धिमान,जास्त पराक्रमी,जास्त सुविचारी,जास्त स्वार्थत्यागी,असे तुम्ही हिंदी राष्ट्राचे घटकावयव आहात. मी तुम्हाला अस्पृश्य समजत नाही.आपण बरोबरीची भावंडे आहोत. आपले हक्क समसमान तरी खास आहेतच. अशा भावना धरून पुढील कामास लागले पाहिजे . माझ्या घरच्या मंडळीनी,आप्तेष्टांनी अगर मित्रांनी सुद्धा विचार न करता माझ्या मागे येऊ नये.माझी मते ज्यास पसंत असतील त्यांनी माझे स्वतंत्रपणे अनुकरण करावे.त्यांना माझ्या कडून कोणत्याही प्रकारचे उत्तेजन अगर मदत मिळणार नाही. या देशाची उन्नती लवकर किंवाउशिरा होणे हे येथील जातीभेद ज्या प्रमाणात नाहीसा होईल त्यावर अवलंबून आहे. महाराज शेवटी म्हणाले, "आपण मला आज 'आपला' म्हटले आहे. त्याप्रमाणे शेवटपर्यंत प्रेम दृढ ठेवा.मी देखील कितीही अडचणी आल्या, कितीही त्रास झाला तरी त्याला न जुमानता आपल्या उन्नतीच्या महत्कार्यात शक्य तेवढा हातभार लावण्यास माघार घेणार नाही."

सामाजिक लोकशाही निर्माण करण्याचे कार्य करीत असताना तत्कालीन वृतपत्रे'केसरी'. 'राजकारण','लोकसंग्रह' यांनी महाराजांवर टीका करण्याचे काम केले . महाराजांवर केलेल्या आरोपांचे खंडन करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी'मूकनायक' मध्ये'काकगर्जना' नावाचा अग्रलेख लिहला.या लेखात बाबासाहेब म्हणतात अस्पृश्यांमध्ये स्वाभिमानाची ज्योत प्रकाशित करण्याचे काम शाहू महाराजांनी केले .

राजर्षी शाहू महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यामध्ये जिव्हाळ्याचे नाते निर्माण झाले होते. महाराज माणगाव च्या परिषदेमध्ये बाबासाहेबांनाउद्देशून माझे प्रिय मित्र आंबेडकर म्हणाले होते. बाबासाहेब महाराजांना अस्पृश्यांचा सखा असे म्हणतात दोघांमध्ये मुक्तपणे संवाद होत असे. सामाजिक लोकशाही कशी निर्माण करता येईल हा चर्चेचा केंद्रबिंदू असे.ब्राह्मणेतर चळवळीचे यथातथ्य ज्ञान इंग्लंड मधील राज्यकर्त्यांना आणि जनतेला व्हावे म्हणून एक इंग्रजीपुस्तक लिहावे असे शाहू महाराजांनी बाबासाहेबांना १९२०च्या भेटीत सांगितले होते.बाबासाहेबांनी ते इंग्लंड ला गेल्यावर लिहू असे सांगितले.

राजर्षी शाहू महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्याप्रयत्नातून सामाजिक लोकशाहीची चळवळ आकारास येत होती त्यावेळी बाबासाहेबांना आपला अभ्यास पूर्ण करण्यासाठी लंडनला जायचे होते.तेंव्हा महाराजांनी मुंबई चे तेंव्हाचे पोलीस आयुक्त ग्रिफिथ यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना परदेशी जाण्याचा परवाना लवकर द्यावा अशी विनंती केली.बाबासाहेबांना आर्थिक सहाय सुद्धा

केले.लंडनचे महाराजांचे मित्र आल्फ्रेड पीस यांनाही एक पत्र लिहून बाबासाहेबांचा परिचय देऊन सहकार्य करण्याची विनंती केली होती.

राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या संस्थानामध्ये १८ सप्टेंबर १९१८ ला महार वतनेखालसा केली.रयतावा म्हणून त्या जमिनी दिल्या महाराना पगारी नोकर म्हणून नेमणूक दिली.हजेरी पद्धत बंद केली.तलाठी नेमताना अस्पृश्यांना प्राध्यान दिले.सामाजिकलोकशाही निर्माण करण्यासाठी त्यांनी जाहीरनामे काढले. त्याची अंमलबजावणी केली गंगारामकांबळे यास हॉटेल काढून दिले. महाराजतिथे चहा घ्येण्यासाठी जात असत.दत्तोबा पवार यास मुन्सिपालटी चेअरमन केले.'दप्तरबंद' म्हणून पोलीस खात्यात नेमणुका केल्या शिकारीच्या खुतात अस्पृश्यांची भरती केली. शिकारी कुत्रे सांभाळण्यासाठी मांग समाजातील तरुणांची नेमणूक केली. अस्पृश्यांसाठी मिसेस क्लार्क नावाचे वसतिगृह काढले.मोफत शिक्षणाची सुविधा दिली.शिष्यवृत्ती सुरु केली.स्पृश व अस्पृश्य मुलांसाठी एकत्र शिक्षणाची सोय केली.आरक्षण जाहीर केले.अशा प्रकारे शाहू महाराजांनी अस्पृश्य समाजातील अनेकांना नोकऱ्या वशिक्षणाची संधी देऊन नवभारत घडविण्याचे व सामाजिक लोकशाही निर्माण करण्याचे कार्य केले .

१६फेब्रवारी १९२२ रोजी दिल्ली येथे महाराजांच्या अध्यक्षतेखाली तिसरे अधिवेशन भरले होते.या भाषणात महाराज म्हणतात ,"तुमचे अध्यक्ष्यपद स्वीकारणे आणि तुमच्या पुढे भाषण करणे हा मान खरोखरीच आंबेडकरांचा आहे .आंबेडकर यांना तुमच्या पैकी आपण एक आहोत असे सांगण्यात अभिमान वाटतो.ते माझ्यापेक्ष्या जास्त शिकलेले आहेत .यावेळी ते लंडन मध्ये असल्यामुळे दुर्दैवाने तुमच्या परिषदेस ते उपस्थित राहू शकत नाहीत. पण ते कोठेही असोत अस्पृश्य वर्गाला जे दुःख होत आहे त्याची जाणीव त्यांच्या हृदयात सतत टोचत असते .याची मला खात्री आहे .याच भाषणात शेवटी महाराज म्हणाले होते "आपण आपले पुढारी मि. भीमराव आंबेडकर यांचे उदाहरण डोळयापुढे ठेऊन त्या प्रमाणे होण्याचा प्रयत्न्न करावा.मी आपला गुलाम आहे , मी आपला दास आहे .माझेकडून आपण सेवा करून घ्यावी." याभाषणामध्ये अस्पृश्यांबद्दलची तळमळ व बाबासाहेबाच्या कार्याचा गौरव केला आहे .

इंग्लंडमध्ये बाबासाहेबआपले शिक्षण घेत असताना ब्राह्मणेतरांच्या हक्काविषयी तेथील लोकमतांचे प्रबोधन करणारी चळवळ चालवीत होते. महाराजांनी बाबासाहेबांना १९२०च्या सुमारातील एका पत्रामध्ये"रा.लोकमान्य आंबेडकर " असे संबोधले.महाराजांचे ६ मे १९२२ला निधन झाले तेंव्हा बाबासाहेब लंडन मध्ये होते १०मे१९२२ ला राजाराम महाराजांना शोकाकुल अवस्थे मध्ये पत्र पाठविले."येथील वर्तमानपत्रात महाराजांच्या मृत्युची बातमी वाचून मला मोठा धक्काच बसला.ही संकटाची घटना मला दोन कारणामुळे दुःख दायकझाली आहे.त्यांच्या मरणाने मी एका वैयक्तिक मित्राला आंचवलो आणि अस्पृश्य समाज एका महान हितचिंतकाला वसर्वात महान कैवा-याला मुकला आहे." लंडनहून आल्यावर बाबासाहेब स्वतः सांत्वन करण्यासाठी कोल्हापूरला गेले .

शाहू महाराजांच्या निधनानंतर बाबासाहेबांनी सामाजिक लोकशाहीची चळवळ गतिमान केली.महार वतन बिल बाबासाहेबांनी मांडले.शाहूमहाराजांसारखा सखा अस्पृश्यांना पूर्वी लाभला नव्हताव पुढे लाभेल कि नाही याबद्दल आम्हास शंका आहे .तथापि त्यांना पक्के कळून चुकले होते की,वतनामुळेच महारांची अधोगती झाली.अनेकवेळा बाबासाहेबांनी महाराजांच्या कामगिरीचा केवळ गौरवच केला नाही तर त्यांनी केलेली मदत त्याविषयी जाहीर वक्तव्ये करून महाराजांचे ऋण व्यक्त केले .

कोल्हापूर येथे १३ जानेवारी १९४० रोजी संपन्न झालेल्या कोल्हापूर प्रजा परिषदेच्या अध्यक्षीय भाषणात बाबासाहेब म्हणाले होते, "कोल्हापूर संबंधी एक गोष्ट अगदी निश्चित आहे व या गोष्टीबद्दल अस्पृश्यांना व मला कोल्हापूरचा अभिमान वाटतो.शाहू महाराजांनी कोल्हापुरात खरी लोकशाहीची मुहूर्तमेठ रोवली. ही ती गोष्ट होय. आपण गोब्राह्मण प्रतिपालक शिवाजी महाराजांची जयंती साजरी करीत असतो.शिवछत्रपतींना ब्राह्मण्य नष्ट नाही करता आलेनाही. आपल्या राज्याभिषेकासाठी सोने देऊन काशीहून गागाभटटाला त्यांना आणावे लागले.ब्राम्हण्याची नांगी तोडण्या बाबतीत शाहू छत्रपती हे शिवरायांपेक्षा श्रेष्ठ होते असे म्हटल्याशिवाय गत्यंतर नाही. शाहू महाराजांच्या अंगी दोष असतील,पण मी असे विचारतो कि,कोणता राजा निर्दोष आहे ? निव्वळ

दोषाकडे पाहण्यात अर्थ नाही ब्राम्हण्य नष्ट झाल्याशिवाय समाजाची उन्नती होणे नाही.त्यांनी ब्राह्मण्य नष्ट करण्याचा धडाडीने प्रयत्न केला यातच त्यांची थोरवी आहे.शाहू छत्रपतीनी समाजातील विषमता नष्ट करण्याचा आटोकाट प्रयत्न केला व ब्राह्मण्याचा बालेकिल्ला ढासळून टाकला.ही काही लहान कामगिरी नाही.माझ्या सार्वजनिक आयुष्याची सुरवात छत्रपतीं महाराजांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या माणगावच्या परिषदेतच झाली.ही गोष्ट येथे नमूद करणे आवश्यक आहे.त्यांना व मला प्रिय असलेल्या समतेच्या प्रचारासाठीरु.२५०० देऊन त्यांनी प्रोत्साहन दिले याबद्दल मी त्यांचासदैव ऋणी राहीन."

समारोप :-

शाहू महाराज हे सामाजिक लोकशाहीच्या चळवळीचे प्रमुख आधारस्तंभ आहेत असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते .भारत देश स्वंतत्र् झाल्यावर शाहू महाराजांच्या स्वप्नातील सामाजिक लोकशाही निर्माण करण्यासाठी भारतीय साविधांनामध्ये अनेक महत्व्याच्या तरतुदी निर्माण केल्या.मूलभूत हक्क ,नीती निर्देशक तत्वे,यांचा अंतर्भाव संविधानामध्ये केला.१५ व्या कलमानुसार जात धर्म ,लिंग,जन्मस्थान,या वरून कोणत्याही प्रकारचा जातीभेद करता येणार नाही. १७ व्या कलमानुसार अस्पृश्यता नष्ट केली संविधानामध्ये आरक्षणाची तरतूद केली गेली.स्वातंत्र्य,समता, बंधुता,न्याय या तत्वानुसार अर्थातच शाहू महाराजांच्या विचाराचा वारसापुढेनेण्याचे काम बाबासाहेबांनी केले. हा वारसा जपण्याचे काम आपण केले पाहिजे.राजकीय लोकशाही बरोबर सामाजिक लोकशाही निर्माण करण्यासाठी आपण कष्ट घेतले पाहिजे.

संदर्भ

१. पवार जयसिंग – राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, महाराष्ट्र इतिहास प्रबोधीणी, कोल्हापूर, २००१
२. येडेकर श्याम – राजर्षी एक व्यक्ती दर्शन, कोल्हापूर
३. कीर धनंजय – राजर्षी शाहू छत्रपती, पोपिलर प्रकाशन, १९९२
४. बहिष्कृत भारत आणी मूकनायक – महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई १९२०
५. साळुंखे पी. बी – राजर्षी शाहू गौरव ग्रंथ , १९८८
६. येडेकर श्याम - राजर्षी शाहू छत्रपती यांची भाषणे, १९७१
७. ढावारे रमेश- मी आणि माणगाव परिषद(माणगाव परिषद ६१ स्मृतीमोहात्सव विशेषांक)